| | |
|---|---|
| MHJN020000171990 | विशेष दिवाणी दावा क्र.७०/१९९०<br>सुलोचना देवी व इतर वि. दुर्गादेवी इतर<br>CNRMHJN020000171990 |

**<u>निशाणी क्र.२६९ वरील आदेश</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२(क) हे प्रतिवादी क्र.५ म्हणून समाविष्ठ असल्याने त्यांचे नाव वगळून त्याऐवजी वारस रेखा शशिकांत अग्रवाल हिस प्रतिवादी क्र.२(क) म्हणून समाविष्ठ करण्यासाठी दिला आहे..

२) या कामी प्रतिवादींतर्फे अर्जावर म्हणणे दाखल केले की, वारस रेखा हिस समाविष्ठ केलेले नाही. सदर दावा अवसान झाला असल्याने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

३) अभिलेखाची पडताळणी केली असता, मयत प्रतिवादी क्र.२ गंगाबाई बालमुकुंद अग्रवाल मयत झाल्यानंतर तिचे वारस प्रतिवादी क्र.२(क) ते २(एफ) हे आदेशान्वये दिनांक १७/०१/१९९४ रोजी समाविष्ठ करण्यात आले. प्रतिवादी क्र.२(क) राजेंद्र बालमुकुंद अग्रवाल हे प्रतिवादी क्र.५ म्हणून अधिच समाविष्ठ असल्याने त्यांचे नाव प्रतिवादी क्र.२(क) म्हणून वगळने उचीत ठरेल. तसेच, वारस रेखा शशीकांत अग्रवाल यांना प्रस्तुतच्या दाव्यात वारस म्हणून समाविष्ठ करण्याचे नजरचुकीने राहून गेल्याने त्यांना प्रतिवादी क्र.२(क) म्हणून समाविष्ठ केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तरी न्यायाच्या दृष्टीने दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२(क) राजेंद्र बालमुकुंद अग्रवाल याचे नाव वगळून वारस रेखा शशीकांत अग्रवाल यांना प्रतिवादी क्र.२(क) असे नमुद करण्यासाठी सदर दुरुस्तीची परवानगी देणे उचित ठरेल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) उपरोक्त नमुद दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करण्यात यावी.

Digitally signed by KULKARNI MADHURI SUDHAKAR
Date: 2022.01.19 17:41:43 +0530

**(माधुरी एस. कुलकर्णी)**

दि.१९/०१/२०२२

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
जालना

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर),जालना

दिनांक : १९/०१/२०२२

सही/-
एम. डी. आढे
लघुलेखक (नि. श्रे).